Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – IV December 2015

# नाथसंप्रदाय

प्रा. डॉ. वेदश्री विजय थिगळे,
सदस्य : मराठी अभ्यास मंडळ, पुणे विद्यापीठ, सदस्य : मराठी विद्याशाखा, पुणे विद्यापीठ.
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख.
कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय, सिडको, नाशिक : ०८.

युगानुयुगे सतत झिरपत राहिलेलं जगनिर्मितीचं आणि विस्ताराचं रहस्य अनेक वर्ष गुपीत ठेवलं गेलं, ते लपविलं गेलं, ते चोरून नेलं गेलं. ते मिळविण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केलेत. काहींना ते मिळालं तर काहींची ती साधनाच राहिली. ज्याला ज्याला मिळालं त्याने ते आपापल्या परीनं स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याला आपल्या मनाजोगा आकार दिला आणि काही मोजक्या लोकांपर्यंत ते पोहोचलं. ज्यांना हे रहस्य माहित होतं, त्यात नाथ संप्रदायाचे प्रवर्तक 'श्री आदिनाथ' आणि त्यानंतर अवघा नाथसंप्रदाय यांचा समावेश होतो.

जगात घडणाऱ्या घडामोडींमागे अमूर्त अशी शक्ती आहे. तिच्या नियंत्रणाखाली जगातले तिन्ही लोकातले व्यवहार पार पाडले जातात आणि यावर सर्वांचाच विश्वासही आहे. प्रत्येकाच्या मनात या शक्तीचे त्याचे त्याचे असे रूप आहे आणि तेच त्याचे श्रध्दास्थानही आहे. त्यामुळे जग नियंत्रित करणाऱ्या या अमूर्त शक्तीचे स्वरूप हे संमीश्र आणि सापेक्ष आहे. तिचा परिचय करून देतांना 'परतत्त्व' असा आपण करून देतो. याचे संदर्भ आपल्या वेदांमध्ये आणि प्राचीन ग्रंथांमध्येही मिळतात. प्रत्येक कालखंडात या शक्तीला वेगवेगळे नाव प्राप्त झालेले दिसते. ते नाव त्या युगाची, कालखंडाची अध्यात्मक्षेत्राला मिळालेली देणगी आहे.

परमेश्वराचे अस्तित्व मान्य करणाऱ्यांमध्ये दोन पक्ष आहेत. ईश्वर ही एक कल्पना आहे किंवा तत्वज्ञानातील अर्थ आहे असे मानणारा एक पक्ष आणि ईश्वर प्रत्यक्षपणे सजीव आहे आणि त्याची धार्मिक विधीनुसार पूजा करणारा दुसरा पक्ष. मानवाच्या स्वतःच्या नैसर्गिक गुणधर्मासंबंधीच्या कल्पना या मानव देवत्वात सहभागी असतो की देवत्व हे मानवाचे उगमस्थान आहे किंवा त्याची प्रतिकृती नाही या बाबतच्या विचारांवर अवलंबून असतात.

कॅल्व्हिन या फ्रेंच प्रॉटिस्टंट धर्मगुरूच्या मते ईश्वर ही कल्पना सर्व मानवजातीत रूजलेली आहे. मानवाला ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव, देवत्वाची आठवण व्हावी आणि ईश्वर हा मानवाचा निर्माता आहे ही कल्पना रूजावी म्हणून त्या त्या धर्म व सांप्रदायिक पातळीवर श्रध्दामय असे प्रयत्न होतात. त्यातील मर्म लेखकाला आकलन करून द्यावयाचे आहे.

परमेश्वराचे नेमके वर्णन आजतागायत कोणालाही करता आहे नाही. कारण मुळातच त्याचे वर्णन करायचे ठरवले तर म्हणता येईल की, 'जो नित्य होता, नित्य राहील, कधी कोणी बनविला नाही आणि तो नष्टही झाला नाही किंवा करताही येत नाही, तो कालसापेक्ष बदलत राहतो, आकारात, आकाराद्वारे किंवा आकाराबाहेर त्यात

परिवर्तन होते तो परमेश्वर.' पण नेमका कोण तर सांगता येत नाही. परतत्वाला मूर्त आकार देण्याचा प्रयत्न झाला आहे, होतो आहे, आणि होत राहील यात शंका नाही.

'नाथ' हे एक तत्त्व असून ते चिरंतन आहे. नाथ शब्दाचा अर्थ सांगतांना प्रभू, स्वामी, रक्षक असा सांगितला जातो. ऋग्वेदातर म्हणे 'नाथ' या शब्दांचे १३० अर्थ दिलेले आहे. इतका व्यापक अर्थ या शब्दात दडलेला आहे. संपूर्ण सृष्टीचे नाथ हे स्वामी किंवा रक्षक आहेत. ते आदि, मध्य व अनादि आहेत. हे तत्व सृष्टी निर्मितीचं तत्व आहे. नाथ तत्त्वाला अनुसरून नाथ संप्रदायामध्ये शिव आदिनाथ आराध्य मानले आहे. गोरक्षनाथ देवाधिदेव शिव आदिनाथरूप मानले गेले आहेत. परंतु अलक्षनाथ सांगतात की, 'शंकर भगवान यांनाही आदिनाथजी यांनी निर्माण केले आहे, त्यांना शरीरावस्था दिली आहे आणि हे खरं तर आदिनाथजी यांनीच सांगितले आहे.' हे कसे याबाबत आपल्या सर्वांच्या मनात कुतुहल जागृत होणे स्वाभाविक आहे. त्यांचा स्वीकार व अस्वीकार हा सापेक्ष असू शकतो. नाथ संप्रदायात तसे लेखन खून झालेले नाही. मुळात ही मंडळी समाजापासून दूर आणि एकांतातच अधिक राहिली. शिवाय नाथ संप्रदायामध्ये एक शिष्य परंपरा असल्याने या संप्रदायाच्या व्याप्ती आणि विस्ताराला मर्यादाही पडल्या असाव्यात. या संप्रदायात फारसे साहित्य लेखन झाले नाही. कारण असे म्हणतात की कोणत्याही चळवळीत यशापयश हे तिला मिळणा—या प्रतिसादावर अवलंबून असते. पण त्यापेक्षा अधिक ते त्या प्रेरणेने होणा—या सकस व सातत्यशील साधनेवर,साहित्यनिर्मितीवर अवलंबून असते. नाथ संप्रदाय ही एक त्याकाळातील एका धार्मिक परंपरेची चळवळच होती. नाथसंप्रदाय हा वैष्णव संप्रदायासारखा विस्तारला नाही.

आपल्या हिंदू धर्मातही अमूर्त अशा परमाम्त्याचे,त्याच्या शक्तची विविध रूपे आहेत. कधी या शक्तिला 'ब्रह्म' असे म्हटले गेले. 'ब्रह्म' म्हणजे निर्माता, तर कधी कधी परतत्व, परकाया, कधी द्वैत तर कधी अद्वैत. परंतु या शक्तीचे दर्शन आपल्याला सद्गुरूशिवाय होत नाही. म्हणून सद्गुरूंच्या मार्गदर्शनाने अनेक तत्वज्ञांनी आपल्या ग्रंथातून त्या शक्तीचे दर्शन करून देण्याचा प्रयत्न केला आहे. याला नाथ संप्रदायही अपवाद नाहीत. श्री नामदेव भोई उर्फ अलक्षनाथ यांनी या शक्तीचं दर्शन नाथसंप्रदायी अवतारांच्या कार्य आणि विचारांच्या आधारे करून देण्याचा श्रध्दामय असा प्रयत्न केला आहे. ईश्वराचा पवित्र आत्मा अन् त्याचे अस्तित्व जाणवू शकते यासाठी त्यांच्या पहिल्या पुस्तकात स्वानुभव दिलेले आहेत. आपल्या वडिलांच्या शरीरात आदिनाथांचा होणारा प्रवेश, वडिलांचे त्या अवस्थेतील वागणे, घडणाऱ्या विविध चमत्कारिक घटना यांचे स्पष्टिकरण देऊन नाथांचे चरित्र, सांप्रदायिक कार्य सांगण्याचा प्रयत्न आहे. या संदर्भात मला प्लेटोचे म्हणणे आठवते. तो म्हणतो की, 'एखाद्या शरीरात प्रवेश करण्याआधी आणि शरीर नाश पावल्यानंतर आत्म्याला अस्तित्व असते.' 'आत्मा साधा आणि अविनाशी असतो आणि संवेदनशक्ती प्राप्त करण्याचे एक साधन म्हणून आत्मा शरीराचा उपयोग करतो तेव्हा आत्मा फरफटला जातो, वारंवार बदल घडणाऱ्या जगात त्याचा वावर राहतो ' असे सॉक्रेटिसही म्हणतो. असेच काहीसे अनुभव लेखकाला त्यांच्या वडिलांबाबत आलेले आहेत. तेव्हा लेखकाला आपल्या बालवयात ते फारसे कळले नाही पण जसं जसे

IIJS Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – IV December 2015

अभ्यासाने, साधनेने अर्थ उलगडू लागले तसा लेखक नाथ चरित्रांचा आणि नाथ संप्रदायाचा मागोवा घेऊ लागला. त्या अभ्यासाचा परिपाक म्हणजे हे पुस्तक आहे. लेखकाने जेव्हा नाथ संप्रदायाचा अभ्यास केला, त्यावरचे संशोधन मिळविले, जाणवेल आणि ज्ञात होईल तसा त्या तत्वज्ञानाचा अर्थ अधोरेखीत करण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ इथेच न थांबता लेखकाला नाथ संप्रदायावर धारावाहिकही बनवायची आहे. तसे प्रपोजलही त्यांनी केले आहे. कारण थबकलेले नाथ संप्रदायाचे तत्वज्ञान आणि काही संप्रदायांचे गुप्त रहस्ये ही सर्व भक्तांसाठी खुले करण्याचा प्रयत्न अनेक लेखकांनी केले आहेत.

अलख निरंजन आदिनाथ आणि नवनाथ यांच्या धार्मिक प्रवासाचे, कार्याचे, विचारांचे आणि अवतार कार्यांचे विवेचन अनेक पुस्तकातून येते. पूर्वीच्या ग्रंथामधून आलेला नाथांच्या म्हणजे खास मैनावतीच्या अध्यायातील असा बराचसा भाग आज अस्वीकाराहार्य वाटतो. तो सर्व टाळून नाथसंप्रदायाचे हाती आलेले वास्तव मांडण्याचा या नव्या लेखकांचा प्रयत्न आहे. आज नाथसंप्रयदायाची धुरा हरिद्वारचे महामंत्री योगी श्री आनंदनाथची, गुरू गोरक्षनाथ आखाडयाचे प्रमुख योगी श्री विलासनाथजी, योगी मोतीनाथ, योगी प्रमोदनाथ यांनी समर्थपणे सांभाळली आहे.

विश्वाचे निर्माते श्री आदिनाथ आहेत आणि त्यांनी सर्व काही निर्माण केले आहे असे लेखकाने आग्रहाने मांडलेले आहे. तुमच्या जीवनात कोणतीही गोष्ट बदलण्याची शक्ती ही केवळ तुमच्याजवळच असते. कारण बदलत्या विचारांची निवड तुमची तुम्हीच करता आणि भावना, श्रध्दा बदलणंही तुमच्याच हाती असतं. कारण तुम्हाला ज्ञान झालेले असते. जे ज्ञान सफल किंवा समर्थ प्रवृत्तीला जन्म देते तेच यथार्थ ज्ञान होय. हे यथार्थ ज्ञान म्हणजे परतत्वच होय. ते प्राप्त करण्यासाठी नाथयोगी सांगतात की त्यासाठी शुध्द अंत:करणाची आवश्यकता असते. विशुध्द सत्व गुण व्यक्तीही या परतत्वाची ध्यान धारणा, योग साधना करू शकते. गुरूच्या उपदेश प्रक्रियेपासून या साधनेचा उदय होतो आणि शुध्द ज्ञानाची निर्मिती होवून त्यासाधनेने आपली ज्ञानमुद्रा आपल्याला परिचित होते. हीच आपली ज्ञानमुद्रा असते.

नाथसंप्रदाय आणि योग यांचे अतूट असे नाते आहे. इंद्रिये आणि बुध्दी यांच्यातील स्थैर्यभावालाच 'योग' असे संबोधिले जाते. विविध धर्मातील धर्मतत्त्वांनुसार या योगाचे महत्व आणि स्वरूप लेखकाने चरित्र सांगता सांगता निरनिराळयाप्रकारे विशद केलेले आहे. गोरक्षनाथांनी नाथ संप्रदायाचा प्रचार आणि प्रसाराचे कार्य मोठया प्रमाणावर केले आहे. त्यांनीच तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणले आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेत असलेल्या दुष्ट चालीरिती, परंपरा, वाईट विचार व विकृती या सर्वांचे समूळ उच्चाटन करण्याचा विडाच गोरक्षनाथजींनी त्यावेळी उचलला होता. त्या कार्यात त्यांना यशही लाभले होते. गोरक्षनाथांना युगधर्माची ओळख पटलेली होती. गोरक्षनाथ हे तत्कालात व्यक्ती आणि कृती यातील एक दुवा होते. गोरक्षनाथजींच्या केवळ याच विचारांतूनच नाथसंप्रदायाचे तत्त्वज्ञान उदयास आले होते.

लेखक अलक्षनाथजी यांनी प्रतिपादन केले आहे की, 'आदिनाथ अलख निरंजन, आदिपुरूष, या

आदिपुरूषांच्या माध्यमातून संस्थापित झालेल्या, मायारूपी मच्छिंद्रनाथ घोषित आणि गुरू गोरक्षनाथ यांनी प्रसारित आणि प्रचारित केल्यानुसार, केवळ तत्कालीन सिध्दपुरूष आणि योगीजनांकडून जो मार्ग दाखविला गेला त्यालाच केवळ 'नाथसंप्रदाय' म्हणणे सार्थ आहे.' नाथतत्व हे निरपेक्ष, कालातीत, नित्य, सर्वव्यापी परचैतन्यरूप असल्यामुळे ते सर्व काळांमध्ये विद्यमान व प्रचलित आहे. अध्यात्मातील गूढ आणि अनाकलनीय ज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्याची प्रत्येकाची अलग अशी पध्दती असते. त्यासाठी कोणी प्रार्थना, तपश्चर्या, संगीत, प्रवचन–कीर्तन, प्रश्नोत्तरे तर कोणी कथा–कथनाचा मार्ग अवलंबितात. नाथ गुरूंनी योग आणि साधना या माध्यमांतून नाथसंप्रदायाचा प्रसार आणि प्रचार केला आहे. याच माध्यमांच्या साहयाने नाथसंप्रदायाचे अधिक महत्व प्रतिपादन करण्याचा प्रयत्न अनेक लेखकांनी केलेले आहेत. अनेकांना नाथसंप्रदायाविषयी तत्कालीन सांप्रदायिक ग्रंथांमध्ये विकृत किंवा नकारात्मक आलेले लेखन मान्य नसल्यामुळे नव्या ग्रंथाचा प्रपंच मांडला जात आहे.निदान पुढच्या पिढीला तरी योग्य अशी दिशा मिळायला हवी. त्यासाठी रामायण, महाभारत, भगवद् गीता व नाथसंप्रदायाची व इतर काही संप्रदायांच्या तत्वज्ञानाची पुस्तकेही वाचली जात आहेत. अशा वाचलेल्या यांसारख्या ग्रंथांतील दाखले देऊन त्या संदर्भात टीका–टिप्पणी देखील केली जात आहे. या संदर्भात बऱ्याचशा कथा लिहिल्या गेल्या आहेत की ज्याबाबत आजही बऱ्याच लोकांना त्या माहितीही नाहीत. तत्काळात 'नवनाथ भक्तिसारा'त नाथांच्या बाबतीत, नवनाथांच्या जन्मकथेच्या बाबतीत विकृत आणि कपोलकल्पितपणे लिहिली गेली आणि विशेषत: योगाचार्य मच्छिंद्रनाथ यांच्यासंबंधी आणि देव–देवतांच्या संदर्भातही बरेचसे चूकीचे झालेले लेखन दुरूस्त केले गेले आहे.

वास्तविक नाथ संप्रदायामध्ये स्त्री–पुरूष संबंध हे निषिध्द मानले आहेत. याबाबतीत नवनाथ भक्तिसार या ग्रंथामध्ये बरेचसे चूकीचे लेखन केले गेले आहे आणि लोकांना याबाबतीत अनभिज्ञ ठेवले गेले. तत्काळात मैथुन सृष्टि अस्तित्वात नव्हती ही माहिती लेखकाने पुरविली आहे. सृष्टी निर्मितीच्या संदर्भात लेखकाने हरिद्वारचे परम पूज्य गुरूवर्य ब्रह्मलिन सिध्दयोगी आनंदनाथजीमहाराज यांचा संदर्भ देवून सांगितले की, 'सत्युगामध्ये तंत्र–मंत्राची उत्पत्ती आणि मानसिक संकल्पनेतून सृष्टिची उत्पत्ती झाली. त्रेतायुगात स्त्री–पुरूष यांच्या इच्छेतून सृष्टिची उत्पत्ती झाली. द्वापारयुगात केवळ प्रेमाखातर आठवण करून इच्छित कार्य प्राप्ती करून घेणे अशी स्थिती होती. कलियुगात मैथुनामुळे सृष्टिच्या निर्मितीला आणि विस्ताराला सुरूवात झाली. म्हणजे नाथांच्या काळात मैथुन अवस्था नसल्यामुळे नाथसंप्रदायाच्या पोथीत आलेला हा मैथुनाचा भाग हा नंतर कोणीतरी जाणीवपूर्वक मिसळला आहे. असे टाकणे त्या त्या व्यक्तिची प्रवृत्ती आहे. असे काही लेखकाचे स्पष्ट मत आहे.

महाराष्ट्रात तर नवनाथांचे गुरू 'गुरूदत्त' असे सांगितले आहे. वास्तविक नवनाथ गुरूदत्त यांचा काहीएक संबंध नाही. परंतु सर्व विश्वामध्ये नवनाथांचे गुरू 'आदिनाथ शिव' हेच मानले जातात. नवनाथ भक्तांनी या ग्रंथाचे पारायण करावे, तो वारंवार वाचावा याच उद्येशाने हा ग्रंथ लेखकाने लिहिला आहे. या ग्रंथाचे पारायण छोटे–मोठे, स्त्री–पुरूष हे सर्व सहजपणे करू शकतात. या ग्रंथाचे पठण केले असता नवनाथांशिवाय दुसरे कोणीही श्रेष्ठ नाही

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – IV December 2015

हे सहजपणे लक्षात येते. नवनाथांचे नामस्मरण केल्यानेच केवळ माणसाला मुक्ती प्राप्त होते, सद्‌गती आणि परमभाग्य प्राप्त होते. मनुष्य जीवनातून चिरविश्रांतीनंतर मानवी आत्म्याला चिरशांती लाभते. नवनाथ भक्तांसाठी श्री नामदेव पांडू भोईंनी लिहिलेले पुस्तक म्हणजे एक पर्वणी आहे. नवनाथांची भक्ती करण्यासाठीचा मार्ग आणि संकटांवर मात करण्यासाठी शाबरी आणि असे अनेक मंत्र या ग्रंथातून दिले आहेत. या ग्रंथाची फलश्रुती देखील दिलेली आहे.

प्रेंटिस मलफोर्ड म्हणतो की, 'तुम्ही जेव्हा सतत एखाद्या गोष्टीचा अभ्यास करतात, अनेक वेळा त्या अभ्यासाकडे अनेक दृष्टीने पाहता, त्याला जाणून घेता आणि त्यात काही बदल करू इच्छिता तेव्हा तुमच्या प्रत्येक विचाराला अस्तित्व येतं आणि तुमचा प्रत्येक विचार एक वस्तू किंवा एक शक्ती बनते' तसेच या पुस्तकाचे आणि लेखकाचे आहे.

खरं तर जगात 'एक 'आकर्षणा'चा नियम आहे आणि तो जगात सर्वात शक्तीशाली आहे. हा सर्वात महान आणि अचूक असा नियम आहे की ज्यावर जगाच्या सृजनाचं समग्र तंत्र निर्भर आहे. मग हे आकर्षण केवळ स्त्री पुरूषातले नाही तर विचारातील,भक्तीतील, साधनेतील, प्रयत्नातील आणखी कशातीलही असू शकते. हा नियम सामान्य माणसालाही लागू आहे. चांगल्या गोष्टींचे आकर्षण संगळयांनाच असते आणि विचारांचे सुध्दा.

एकदा का तुम्हाला हे आपल्यासभोवती असलेले सृष्टीच्या निर्मिती विषयी, देवदेवतांविषयी, त्यांच्या अवतार आणि अवतार कार्याविषयी,ज्ञान आणि ज्ञानप्रसाराविषयीचे रहस्य कळले किंवा तुम्ही ते जाणून घेतले की, तुम्ही तुम्हाला हवं ते मिळवू शकता किंवा करू शकता किंवा बनू शकता. म्हणजे मग आपलीच ओळख आपल्याला होते. सारे विकार गळून जातात आणि उरतो तो शुध्द असा विकाररहित श्वास, मन, आणि भावना जे भक्तीसाठी खूप आवश्यक असतं. असं मन घेवून लेखकाने स्वत:ला झालेलं आकलन मांडलेले आहेत खरं सांगायचं तर अशा विषयांकडे वळणारे फारच कमी असतात. पण लेखकाला म्हणजे अलक्षनाथ यांनी संप्रदायाची धुरा पुढे न्यायची आहे. हे तत्वज्ञान सामान्य माणसांसाठी खुले करावयाचे आहे. भक्तांना साधी, सुलभ अशी भक्ती सांगायची आहे. त्यासाठी करावी लागणारी साधना सांगावयाची आहे.